**नैसर्गिक आपत्तीमध्ये शेत जमीनीच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मदतीच्या अटीमध्ये सुधारणा करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०२२/प्र.क्र.३३८/म-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०२२.

वाचा : १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०१५/प्र.क्र.४० /म-३, दि.१३.०५.२०१५
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-२०२२/प्र.क्र.२५३/म-३,दि.२२.०८.२०२२

प्रस्तावना:

केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निकषाच्या धर्तीवर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या आपद्ग्रस्त व्यक्तींना द्यावयाच्या मदतीचे दर व निकष शासन निर्णय महसूल व वन विभाग, दि.१३.५.२०१५ अन्वये निश्चित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या मदतीच्या विविध बाबींवर राज्य शासनाने वेळोवेळी वाढीव दराने निधी देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. महसूल व वन विभागाच्या दि.१३.५.२०१५ च्या शासन निर्णयामध्ये केंद्र शासनाच्या निकषानुसार २ हेक्टर मर्यादेपर्यंत जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना शेतजमीन नुकसानीसाठी मदत देण्याकरिता पुढीलप्रमाणे तरतुद आहे.

| | |
|---|---|
| अ) शेत जमिनीवरील गाळ (वाळूचा/ गाळांचा/ मातीचा थर ३ इंचापेक्षा अधिक जमा झाल्याचे, राज्य शासनाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक) | प्रत्येक बाबींकरिता रु.१२,२००/- प्रति हेक्टर (मात्र, लाभार्थ्यांनी अन्य कोणत्याही शासकीय योजनेखाली मदत अथवा अर्थसहाय्य / अनुदान घेतलेले नसावे. |
| ब) डोंगराळ शेत जमिनीवरील मातीचा ढिगारा (मलबा) काढणे. | |
| क) मत्स्यशेती दुरुस्ती करणे/ मातीचा थर काढणे/ पूर्ववत करणे | |
| ड) दरड कोसळणे, जमीन खरडणे खचणे व नदी पात्र/ प्रवाह बदलल्यामुळे शेत जमिन वाहून जाणे | महसूल अभिलेखानुसार शेत जमिनींचे मालक असलेल्या फक्त अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना रु.३७,५००/- प्रति हेक्टर या दराने मदत अनुज्ञेय राहील. |

केंद्र शासनाच्या निकषानुसार वरीलप्रमाणे शेत जमिन व इतर नुकसानीसाठी दिली जाणारी मदत ही केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना अनुज्ञेय असल्याने २ हेक्टर पेक्षा जास्त जमिन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना जरी त्यांच्या शेतजमिनीचे वर नमूद कारणास्तव नुकसान झाले तरी, कोणत्याही स्वरुपाची मदत देण्यात येत नाही. तथापि, केंद्र शासनाचे हे निकष शिथिल करुन २ हेक्टरपेक्षा जास्त जमिन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना देखील या योजनेचा लाभ देण्यात यावा, अशा स्वरुपाची मागणी शासनास प्राप्त झालेली होती. त्यानुसार निर्णय घेण्याची बाब काही काळ शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:**

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेत जमीनीच्या नुकसानीकरिता महसूल व वन विभागाच्या दि.१३.५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये देय असलेली मदत विहित अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या २ हेक्टर पेक्षा जास्त जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना देखील २ हेक्टरच्या मर्यादेत अनुज्ञेय करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. चालू हंगामामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतजमीनीच्या नुकसानीबाबत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आवश्यक त्या निधी मागणीचे प्रस्ताव सर्व जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांच्या मार्फत शासनास सादर करावेत.ही मागणी सादर करतांना विहित इतर अटी व शर्ती यांची पूर्तता झाल्याची खात्री करण्यात यावी. तसेच शेत जमीनीचे नुकसान झाल्याची खात्री करण्याकरिता ई-पीक पाहणीचा अथवा अन्य उपलब्ध नोंदीचा आधार घेण्यात यावा.

३. वरील प्रयोजनासाठी होणारा खर्च प्रधान लेखाशीर्ष २२४५- नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर चक्रीवादळे इत्यादी अंतर्गत लेखाशिर्षाखाली राज्य शासनाच्या मंजूर व उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

४. सदर आदेश, वित्त विभागाच्या अनेपचारिक संदर्भ क्र.३४३/२०२२/व्यय-९, दि. २१ ऑक्टोबर, २०२२ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२१०३१११३१२०९३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Sanjay Audumbar Dharurkar
Date: 2022.10.31 11:34:36 +05'30'

**( संजय औ. धारूरकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन,मुंबई
३. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
४. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
५. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
६. प्रधान सचिव (कृषी), कृषि व पदुम विभाग
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१०. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
११. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१२. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१३. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१४. निवड नस्ती (कार्यासन/ म-३).